# कोरोना संकट आणि भारतीय संत साहित्याचा पर्याय

**प्रा.डॉ. सुजय बाबूराव पाटील**
मराठी विभाग, कमला कॉलेज, कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

संतांच्या साहित्य विचारांमधून समाजजीवनात येणार्या कोणत्याही संकटांना, पेचप्रसंगांना, नीतिधैर्य न सोडता कसे सामोरे जावे याची शिकवण अंतर्भूत झालेली आहे. आजच्या कोरोना महामारीच्या पार्श्वरभूमीवर सामाजिक संयम फार महत्त्वाचा ठरतो. वैयक्तिक व सामाजिक सुरक्षितता कशी सांभाळावी, यासंदर्भातील मार्गदर्शन संतसाहित्यातून होत राहते. यासंदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार निश्चिातच उपकारक ठरतात.

**सेवा शब्दाविणही बोलकी !**

आज संपूर्ण जग कोरोना महामारीच्या सावटाखाली अक्षरशरू जीव मुठीत घेऊन जगत आहे. या साथीच्या रोगाला कोणता देश कारणीभूत आहे? याची चर्चा मागे पडून या महामारीच्या संकटावर आपण मात कशी करायची, या पार्श्वतभूमीवर संपूर्ण जगभर विविध उपयोजनांची धावपळ चाललेली दिसते.

जलचरांशी स्पर्धा करणारी सागरी वाहतूक, आकाश व्यापून टाकणारी हवाई वाहतूक, वार्याच्याही वेगाला मागे टाकणार्याध बुलेट ट्रेनचे जाळे अंगाखांद्यावर मिरविणारे देश कोरोनाच्या भीतीने 'लॉकडाऊन'च्या नावाखाली कड्याकुलपात बंद आहेत. याला आपला देशदेखील अपवाद नाही. या महामारीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ यांच्या कार्यालयापासून गावचावडीपर्यंत सर्वयंत्रणा गतिमान झालेल्या दिसतात.

साथीचे रोग आपल्याला अपरिचित आहेत असे नाही. प्लेग, कॉलरा, टी.बी., पोलिओ, कुष्ठरोग, इबोला, सार्स, स्वाईन फ्लू यांसारख्या संसर्गजन्य रोगावर विजय मिळविलेला आहे. शंभर वर्षांपूर्वी आपल्या देशात पसरलेल्या प्लेगसारख्या साथीच्या रोगाच्या पार्श्वाभूमीवर आजची आपल्या देशाची कृषी, आरोग्य विज्ञान, दळणवळण इ. क्षेत्रांतील स्थिती समाधानकारक आहे. या जोरावर आपण 'कोरोना'सारख्या आजच्या संकटावर सामूहिक प्रयत्ना्तून सहज विजय मिळवू, असा आत्मविश्वावस सर्वत्र दृढ झालेला दिसतोय पण सामाजिक संयमाची आज फार मोठी गरज निर्माण झालेली दिसते. सामाजिक संयमासाठी विविध पातळीवर सकारात्मक विचारप्रणालीचा प्रसार, प्रचार केला जात आहे. अशावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांसारख्या संतांच्या विविध सामाजिक विचारांचा मोठा आधार वाटणे स्वाभाविक आहे.

संतांचे विचार कधीही तात्कालिक नसतात. बदलणार्या प्रत्येक परिस्थितीमध्ये ते दिशादर्शक ठरत असतात. सामाजिक संयमासाठी उपकारक ठरत असतात. 'घरात राहा, कोरोना टाळा' असे सांगितले जात आहेय पण ज्यांना घरच नाही, ज्यांचं आयुष्य रस्त्याकडेलाच संपून जात आहे, अशा बेघरांनी, मनोरुग्णांनी कुठे जावे, हा प्रश्ना आ–वासून उभा राहिला, तेव्हा शासनाने, अनेक सेवाभावी संस्थांनी अशा बेघरची, मनोरुग्णांची शासकीय इमारती, शाळा, गोडाऊन इथे राहण्याची, जेवणा–खाण्याची व्यवस्था केली. अनेक अजारांनी ग्रस्त असणार्यी मनोरुग्णांची, फिरस्त्यांची शारीरिक व मानसिक सेवा स्वयंसेवक आणि डॉक्टरांनी सुरू केली. अंघोळ घालणे, डोईचे अस्ताव्यस्त केस कापणे, औषधोपचार करणे, चांगले कपडे घालण्यास देणे असे उपचार त्यांच्यावर सुरू झाल्यामुळे आपण माणसांत जमा आहोत. या जाणिवेने या मनोरुग्ण व बेघरांच्या चेहर्यातवर फुललेले हास्य संकटात संधी कधी शोधायाची व मानवतेची वेल कशी फुलवायची याचे उत्तम उदाहरण म्हणून याकडे पाहता येते. या मनोरुग्णांची सेवा करणारे कोणत्याही लाभासाठी, प्रसिद्धीसाठी हापापलेले नाहीत. त्यांनी ही सेवा समाजाचे हृदय जिंकणारी, आत्मीयता वाढविणारी आहे.

**'सेवा शब्दविणही बोलकी । सर्व लोकां करोनि सुखी ।**

**त्यांचे हृदर सहज जिंकी । आत्मीयता वाढवी ॥**

अशा शब्दांत या सेवा परंपरेचा गौरव तुकडोजींनी आधीच करून ठेवलेला दिसतो.

'जिथे आहात तिथेच थांबा' सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक असणार्या या आवाहनामुळे अनेक मजूर, कामगारवर्ग अनेक शहरांमध्ये अडकून पडला आहे. हाताला काम नाही. दामही नाही. दाम नाही तर पोटाला काय खावं हा यक्षप्रश्नव या असंघटित, हंगामी कामगारवर्गासमोर उभा राहिला. अशाप्रसंगी आपल्या गावाकडची, आपल्या माणसांची ओढ या कामगारांना बेचौन करू लागली. स्थलांतरांचे लोंढे कित्येक हजारो मैलांचा पायी प्रवास करण्यासाठी रात्री–अपरात्री रस्ता तुडवू लागलेय पण हे स्थलांतरितांचे चालणे समाजाच्या जिवावर उठणारे होते. रोगाचा फैलाव करणारे होते. अशावेळी त्यांना अश्वा सित करून पुन्हा थांबलेले गेले. त्यांच्या सुरक्षित निवार्याफची, जेवणा–खाण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यांची सर्वोपरी काळजी घेण्यासाठी शासन व सामाजिक संस्थांनी कंबर कसली. शासनाच्या व स्वयंसेवकांच्या निःस्वार्थी मेहनतीला फळ आले. स्थलांतरांचे लोंढे थांबले. रोगाचा सार्वजनिक लोंढे थांबले. रोगाचा सार्वजनिक फैलाव थांबत चालला. यासाठी झटणार्याथ अशा पोलिस, डॉक्टर, परिचारिका यांचे वर्तन ग्रामगीतेतील विचाराला आदर्शवत असे वाटते.–

**'घरीं, दारीं, सर्वदुरी । सेवकांचे प्रेम सर्वांवरी ।**

**तरीच तो प्रचार करी । आदर्शाचा कृतीने ॥**

अनेक गाव, शहरे यांनी शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत वैयक्तिक व सार्वजनिक आरोग्याला प्राधान्य दिलेले दिसते. नगरपालिका, महानगरपालिका, आरोग्य विभाग यांनी सुरू केलेल्या स्वच्छता मोहिमेला गावकरी सहकार्य करीत आहेत. गावकर्यां चे, नागरिकांचे हे सहकार्य म्हणजे गावचे भाग्य उजळणारे आहे. अशा गावकरांच्या कौतुकावेळी तुकडोजींचे शब्द जवळचे वाटतात.–

'ऐसे जें गांव वागलें। त्या गांवचे भाग्य उघडलें।

नाही तरी टक्के टोणपे आले। नशिबी त्यांच्या ॥

संचारबंदीच्या काळात अनेक नाठाळ लोक विनाकारण रस्त्यांवर उनाडक्या करीत फिरत राहतात. मला काय होतंय! अशा अविर्भावात मोकाट जनावरासारखे फिरत राहून शासनाच्या प्रयत्नांवर पाणी फिरवितात. अशांचे वागणे 'गावघातकी'पणाचे ठरू शकते. हे गावघातकी वृत्तीचे लोक प्रत्येक कालखंडात दिसून येतात. अशांचा समाचार घेताना तुकडोजींनी लिहून ठेवलेले आहे.–

'यांत कोणी उनाड दिसला । त्यासि उपदेश द्यावा चांगला ।

एवढें करोनि नाहीं वागला । तरि तो झाला वहिरंग ॥

यासि उपाय करावा काहीं । त्यासाठीं मार्ग दोनचि पाही ।

कायदा अथवा धर्ममार्ग राही । सेवाभावे समज द्यावी ॥

मानवाच्या जीवनशैलीच्या विसंगतीमुळेच साथीच्या रोगांचा फैलाव जगभर झालेला दिसतो. सारे काही खाण्यासाठीच आहे. या गैरसमजातून वासनेच्या हव्यासापोटी पशूपक्षी, जीवजंतू अन्न म्हणून स्वीकारले गेले व आपसुकच अनेक साथीच्या रोगांना निमंत्रण मिळत गेले. आपण मनुष्य आहोत. मानवधर्माला शोभणारा आहार, विहार असावा. निसर्गधर्मानुसार साजेसाच आहार–विहार असावा. निसर्गधर्मानुसार वागणे ठेवले, तर रोगराईपासून दूर राहू. तुकडोजींनी याबाबतीने मार्गदर्शन करताना लिहून ठेवलेले आहे.

'काही जीन चुनखडी खाती । कांही मांस, किडे भक्षिती ।
आंत वाढत जातां विकृती । धन्वंतरीही काय करिती ।
नष्ट कोरोनि औषधें । मुखी माती पडतसे ।
मानवाने काय खावे । म्हणजे मानवपणेंचि शोभावे ।
हेचि येथें पहावें । लागते सज्जनासि ।'

आपल्या देशावरील किंबहुना जगावरील हे महामारीचे संकट नाहीसे व्हायचे असेल, तर शासनाच्या सर्व सूचनांचे प्रत्येकाने पालन करावे. आदर्श नागरिकांचे भूमिका बजावत स्वतरूचे, समाजाचे व विचारांचे संरक्षण करावे, यातच आपले हित आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून

शक्य तितकी मदत समाजाला करावी. मानवातील सद्‌गुणांना आवाहन करावे. अशा कसोटीच्या वेळी तुकडोजींचे पुढील बोल दिशादर्शक वाटतात.–

'अरे ! उठा उठा श्रीमंतांनो । अग्निकार्यां नो पंडितांनो ॥

सुशिक्षितांनो । साधुसंतांनो । हांक आली क्रांतीची ।
गाव–गावसी जागवा । भेदभाव हा समूळ मिरवा ।

उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ॥

**निष्कर्ष :**

1) संतसाहित्याची उपयुक्तता सर्वकालिक आहे.
2) संतसाहित्यातील नैतिक विचार, सामाजिक शांतता व संयम यांना उपयुक्त ठरतो.
3) कोरोनाविरोधी लढ्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचार निश्चित मार्गदर्शक ठरतील.
4) महामारीच्या विरोधात लढणारे शासन, स्वयंसेवी संस्था, डॉक्टर यांच्या गुणगौरवाचा यथोचित गौरव करण्यासाठी, प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भूमिका मार्गदर्शक ठरेल.
5) कोरोना महामारीच्या लढ्यासाठी सामुदायिक प्रयत्न, वैयक्तिक शारीरिक व मानसिक स्वच्छता व स्वास्थ्यासाठी संतसाहित्य नेहमीच मार्गदर्शक ठरेल.

**संदर्भ :**

1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित ग्रामगीता सुबोध निरुपण, डॉ. अशोक कामत, प्रकाशक, गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे 20009.
2) ग्रामगीता, श्री गुरुदेव प्रकाशन अमरावती, पुणे 2009
3) राष्ट्रसंत आणि ग्रामगीता, प्रकाशन मराठी जनसाहित्य परिषद, डॉ. सुभाष सावरकर, 1 ऑक्टोंबर 2000.